# M/s. AMEYA DEVELOPERS PVT. LTD.

*CIVIL ENGINEERS AND CONTRACTORS*


REGISTERED WITH GOVERNMENT OF MAHARASHTRA
WATER SUPPLY & SEWARAGE BOARD MUMBAI MUNICIPAL CORPORATION

**(Aiming For Specialisation in Bridge Construction)**

**&**

## M/s. Y. G. PATWARDHAN & ASSOCIATES

*PROJECT MANAGEMENT CONSULTANTS, CONSULTANTS AND CONTRACTORS FOR REHABILITATION OF ARCH BRIDGES*



Major Bridge on Godavari river on Limba-Vita Sonpeth Road (MDR-56) in Parbhani Dist. (Maharashtra). The Bridge was awarded Third Prize in Category (PSC) by Indian Bridge Engineers in 1997

• Contact •

**Y. G. PATWARDHAN,** (MANAGING DIRECTOR)

**AMEYA DEVELOPERS PRIVATE LIMITED**

8, Laxman Park, 65/1 Navi Peth,

Lalbahadur Shastri Road, Opp. Happy House, Pune-411 030

☎ (Office) : (0212) 539246, 539247, 539248 Tele Fax. : (0212) 539250





# संस्कार : निसर्ग शिक्षणातून

प्रकाश गोळे

*निसर्ग सर्वव्यापी आहे. शिक्षणाचे माध्यम म्हणून त्याचा उपयोग करायचा, तर जीवनाच्या सर्व अंगांना त्याचा स्पर्श झाला पाहिजे.*

पहिले निसर्ग निरीक्षण शिबीर मी घेतले १९७३ मध्ये. पैगंबरवासी डॉ. सलीम अली या शिबिराला आवर्जून उपस्थित होते. आज ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध असलेले पुण्यातील अनेक निसर्गप्रेमी आणि तज्ज्ञही या शिबिरात सहभागी झाले होते. हे शिबीर पार पडले, पनवेलजवळच्या कर्नाळा अभयारण्यात. तीन दिवस शिबिरार्थींनी सलीम अलींसमवेत पक्षी-निरीक्षणाचा आनंद लुटला. पानाफुलांवरून झाडे-वेली ओळखल्या, फुलपाखरे पाहिली, एवढेच नव्हे तर साप-विंचू पकडून त्यांच्या सान्निध्याचा साहसानंद घेतला. पक्षी, पाने-फुले, कीटक यांची ओळख करून घेणं हेच तर या शिबिराचं मुख्य उद्दिष्ट होतं.

आता भारतभर असंख्य संस्था अशी शिबिरे भरवितात. पण २५ वर्षांपूर्वी ही कल्पना अगदी नवीन होती. गेली सुमारे १०० वर्षे निसर्ग-निरीक्षणाचे व संशोधनाचे काम करणाऱ्या मुंबईतील एका नामवंत संस्थेनेसुद्धा सर्वसामान्य लोकांसाठी असे शिबीर कधी घेतले नव्हते. नवीन उपक्रमांचे जसे स्वागत सर्वसामान्यपणे आपल्याकडे होते, तसेच या उपक्रमाचेही झाले. थट्टा, उपहास, हेटाळणी हे सर्व काही आमच्या कानांवर आले. 'पाखरं पहात बसण्यापेक्षा खेड्यांतून जाऊन काम केलेत, तर राष्ट्रोद्धार होईल', असा पोक्त सल्लाही आम्हाला दिला गेला. ज्या निसर्ग-संरक्षण संस्थेच्या वतीने मी हे शिबीर आयोजित केले, त्या संस्थेनेही या शिबिरास सहाय्य दिले नाही. लोकांमध्ये निसर्ग-निरीक्षणाचा प्रचार करण्यापेक्षा निसर्ग-संरक्षणासाठी निधी उभारणे जास्त महत्वाचे आहे असे मला सांगण्यात आले. आज, २५ वर्षानंतर मात्र हीच संस्था, आपल्या शाखांद्वारे निसर्ग-निरीक्षणाची शिबिरे भारतभर भरवीत आहे. निसर्ग - निरीक्षणातून निसर्ग-संरक्षणाबद्दल लोकांना जागरूक करणे, हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट बनले आहे.

निसर्ग - निरीक्षण शिबरे, निसर्ग-निरीक्षण सहली, यासाठी देश-परदेश प्रवास, या गोष्टी आता खूपच लोकप्रिय झाल्या आहेत. कित्येक संस्था या क्षेत्रात हिरीरीने उतरल्या आहेत. कित्येकांनी त्यास एक व्यवसाय, अर्थार्जनाचे साधन समजण्यास सुरुवात केली आहे. त्यास लोकमान्यता लाभली आहे, तीही या कारणांमुळे. **कोणी त्याकडे एक वेगळा अनुभव या दृष्टीने पाहतात, कोणाच्या मनाला चार घटका निसर्गात घालविल्याने विरुंगळा मिळणार असतो, कोणी भरपूर व्यायाम, मोकळी हवा यांनी आरोग्य सुधारेल म्हणून आलेले असतात, कोणाला नवनवीन अभयारण्ये आणि त्यातील पक्षी-प्राणी पाहण्याचा हव्यास असतो, तर कोणी नवीन मित्र-मैत्रिणी जोडणाऱ्या आशेने आलेले असतात. निव्वळ मजा करणारे आणि स्वत:च्या निसर्ग-ज्ञानात खरोखरच भर घालू इच्छिणारे, असे दोन टोकांचे लोकही थोडे असतात.**

निव्वळ अर्थाजन या दृष्टीने अशा शिबीरांकडे पाहणारे संयोजकही फार थोडे असतील. निसर्ग-निरीक्षण हा शिक्षणाचा एक अत्यावश्यक भाग आहे, असे समजून अशी शिबिरे भरविणारे संयोजकच बहुसंख्य असावेत. जे संयोजक शाळेतल्या मुलांसाठी शिबिरे भरवितात, त्यांचा उद्देश तर निसर्गाच्या माध्यमातून मुलांच्या मनावर विशिष्ट संस्कार घडवावेत असाही असतो. पालकही याच भावनेने मुलांच्या या शिबिरात भाग घ्यायला लावतात. पुष्कळशा पालकांची, एवढेच नव्हे तर तरुणांचीही कल्पना अशी असते की निसर्गप्रेम, निसर्गनिरीक्षण या गोष्टी मुख्यत; मुलांसाठी आहेत. एकदा तुम्ही महाविद्यालयाच्या परिसरात शिरलात की अर्थार्जनासारख्या व्यावहारिक गोष्टी महत्त्वाच्या. संपत्तीच्या मीनाबाजारात निसर्ग-निरीक्षण हा एक अव्यावहारिक षोक किंवा छंद ठरतो. त्यामुळेच निसर्गाविषयी महाविद्यालयीन तरुणांसमोर बोलण्याचा जेव्हा मला प्रसंग येतो, त्यावेळी त्यातले काही मानभावीपणे मला विचारतातही की, या गोष्टी तुम्ही शाळेतल्या मुलांना का नाही सांगत?

**म्हणूनच निसर्ग-निरीक्षण आणि संशोधन या क्षेत्रात गेली ३० वर्षे काम करणाऱ्या माझ्यासारख्याला एक खंत सतत जाणवत राहते. ती म्हणजे निसर्ग-निरीक्षण, संरक्षण, संवर्धन यांचा**



**व्यवहारी जगाशी सांधा जुळविण्यात निसर्गप्रेमींना आलेले अपयश.**

**व्यवहारी जग निसर्गाकडे मानवी जीवनास उपयुक्त असलेली एक वस्तू म्हणून पाहते. या दृष्टिकोनाशी जमवून घेऊन सर्वसामान्य लोकांचा पाठिंबा मिळवू पाहणारे निसर्गप्रेमीही, ' जंगलांकडे भविष्यातील पाणी, अन्न आणि औषधे यांचा पुरवठा म्हणून पहा आणि जंगले वाचवा ' अशी जनतेला विनंती करतात.** बहुसंख्य जनतेला मात्र निसर्गातून या वस्तू आज हव्या असतात. ज्यांचे पोट आज भरणार नसते, त्यांना उद्याची चिंता करायची गरज नसते. निसर्गप्रेमी मात्र अशा वर्गांतून आलेले असतात की, ज्यांची पोटे आज तुडुंब भरलेली आहेत आणि तशीच ती सतत भरलेली रहावीत म्हणून निसर्ग सुदृढ राहिला पाहिजे, असे त्यांना वाटत असते. निसर्ग-निरीक्षणातून निसर्गप्रेम आणि निसर्गसंवर्धन साधले जाईल, अशी आशा बाळगून ही शिबिरे भरविणाऱ्यांकडेही व्यवहारी जगातला हा विरोध कमी करण्याचे साधन नसते.

म्हणूनच तरुण आणि प्रौढ लोकांसाठी भरविल्या जाणाऱ्या अशा शिबिरांतून तयार होतात, ते निसर्गपर्यटक - सुंदर निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी पैसा खर्च करण्याची इच्छा आणि कुवत असणारे. निसर्गसंवर्धनासाठी पैसा, वेळ व श्रम खर्च करू इच्छिणारे किती तयार होतात, हा प्रश्नच आहे, आणि जरी थोडे अशा प्रकारचे लोक असले तरी त्यांना निसर्गसंवर्धन करण्याची संधी तरी आपल्या समाजात आज कुठे उपलब्ध आहे! मग कोणी सुंदरशी बाग करतो, कोणी पक्षी - प्राणी पाळतो तर कोणी तऱ्हेतऱ्हेचे दुर्मिळ, परदेशी, वृक्ष लावण्यात धन्यता मानतो!

त्यामुळे निसर्ग-निरीक्षण शिबिरातून मुख्यत: निसर्ग-पर्यटक निर्माण होतात, हे जेव्हा मी पाहिले, तेव्हा निसर्ग-निरीक्षण शिबिरे भरविण्याचे मी थांबविले. संशोधन प्रकल्प हातांत घेतले ते असे होते की प्रत्यक्ष निसर्ग-संवर्धन करण्याची संधी त्यांना मिळेल. यामुळे निसर्गसंवर्धन थोडे फार तरी आपल्या हातून होऊ शकले, याचे समाधान मला असले तरी इतर अनेकांना ते कसे मिळू शकेल, व्यवहारी जगताशी सांधा जुळवून निसर्ग-संवर्धनाला चालना कशी मिळेल, याबाबत माझे चिंतन सतत चालूच असते. या चिंतनातून आज तरी मी अशा निष्कर्षाप्रत आलेलो आहे की ज्यांच्यामुळे प्रचलित आचार-विचारांना धक्का बसेल.

**निसर्ग-शिक्षणाचे उद्दिष्ट कोणते, त्यामधून कोणते संस्कार अभिप्रेत आहेत, असे कोणी मला विचारले, तर मी म्हणेन की उद्दिष्ट असावे, शिक्षणार्थींना विवेकी उपभोक्ता (वाइज कंझ्युमर) बनविण्याचे, आणि त्यासाठी संस्कार हवेत संपत्तीची मर्यादित अभिलाषा बाळगण्याचे. निसर्गाच्या माध्यमातून हे कसे शक्य होणार? असे कोणी मला विचारतील. माझे उत्तर असे की निसर्गाविषयीच्या चुकीच्या, भ्रामक आणि स्वप्नाळू कल्पना आपण जर टाकून देऊ शकलो, तर हे साध्य होईल.**

या कल्पना कोणत्या? निसर्गातील समतोल ही त्यापैकी एक प्रमुख संकल्पना. व्यावहारिक धोरणापासून अध्यात्मिक समाधानापर्यंत ही संकल्पना राबविली जाते. मात्र या संकल्पनेचे आज जे अर्थ लावले जातात, ते निसर्गाविषयींच्या भ्रामक, स्वप्नाळू जाणीवेतून उमजले आहेत, हा थोडा विचार केला तर लक्षात येईल.

भौतिकशास्त्राच्या नियमांनुसार विश्वातील, पृथ्वीवरील द्रव्य (मॅटर) स्थिर आहे. तिच्यात वाढ किंवा घट करणे कोणालाही शक्य नाही. ऊर्जेचा प्रवाहही स्थिर आहे. ऊर्जेच्या सहाय्याने द्रव्याचे फक्त परिवर्तन आपण करू शकतो. उत्पादन, उपभोग

आणि विघटन या क्रिया पृथ्वीवर सतत चालू असतात. ऊर्जेच्या सहाय्याने. या चक्राकार क्रियांमध्ये द्रव्य सतत फिरत असते. पृथ्वीवरील प्रत्येक जीव या क्रियांमध्ये सामील होऊन अन्न मिळविण्याची जगण्याची धडपड करीत असतो. या क्रिया आपल्याला फायदेशीर कशा होतील, हे प्रत्येक जीव पहात असतो, त्यासाठी प्रयत्न करीत असतो. यालाच आपण जगण्याची धडपड म्हणतो. या धडपडीत कोणताही एक जीव फार काल यशस्वी ठरू शकत नाही. त्याचे इतर स्पर्धक त्याच्यावर मात करतात. या परस्पर स्पर्धेतून, धडपडीतून प्रत्येकाच्या वाट्याला निसर्गाचा इवलासा भागच फक्त येतो. सर्वांच्या स्पर्धेतून, धडपडीतून एक प्रकारचा समतोल जेव्हा साधला जातो, तेव्हा प्रत्येकाला फक्त पोटापुरते मिळते, इथे चैन नाही, साठेबाजी नाही, अनिर्बंध प्रजोत्पादन नाही. एका दृष्टीने निसर्गाचे गुलाम असलेले हे जीव निसर्गाच्या पूर्ण कह्यात आहेत. थोडक्यात समाधान मानणारे आहेत, नव्हे निसर्गाची तीच शिकवण आहे. **निसर्गाचा समतोल म्हणजे थोडक्यात समाधान. नफा, सतत वाढणारा नफा, संपत्तीचा साठा या गोष्टी निसर्गाला मंजूर नाहीत.**

**निसर्गाच्या माध्यमातून मनावर संस्कार घडविणारे किंवा घडवू पाहणारे लोक, शिबिराचे संयोजक, ही गोष्ट शिक्षणार्थींना सांगतात का? माझ्या माहितीप्रमाणे मुळीच नाही!**

का नाही? कारण माणूस हा एकच जीव असा आहे की जो बुद्धीच्या सहाय्याने, त्याला प्राप्त झालेल्या तंत्रशक्तीच्या सहाय्याने इतर जीवांवर मात करून, त्यांच्या तोंडचा घास काढून स्वतःच्या घशात लोटू शकतो. पृथ्वीवरील वनस्पतीजन्य उत्पादनापैकी जवळपास निम्मा भाग एकटा माणूस आज गिळंकृत करीत आहे. उरलेल्या कोट्यावधी जीवांना उरलेल्या निम्म्या भागात समाधान मानावे लागत आहे, त्यामध्ये कित्येकांची उपासमार होऊन ते नष्ट होऊ लागले आहेत. यामुळे निसर्गात प्रचंड असमतोल झालेला आहे, ही जाणीव आता अनेकांना होते आहे. पण निसर्गात समतोल निर्माण करणं म्हणजे माणसाचा आजचा उपभोग कमी करणं, ही जाणीव मात्र सार्वत्रिक नाही. उलट ' 'जनहो, खादी वापरा' ' या म्हणीप्रमाणे स्वतः नाही, इतरांनी उपभोग कमी करावा, असं मानवी समाज एकमेकांना बजावीत आहेत. गरज आहे, प्रत्येक समाजानेच निसर्गाच्या असमतोलावर मर्यादा घालण्याची, संपत्तीचे साठे मर्यादित करण्याची. निसर्गाच्या माध्यमातून ही जाण सार्वत्रिक होत नसेल, तर ते निसर्ग-शिक्षण नव्हेच असे मी म्हणेन. ही जाण सर्वत्र पोहोचेल तेव्हाच मला अभिप्रेत असलेला विवेकी उपभोक्ता निर्माण होईल!

निसर्गाच्या माध्यमातून गरीबांची आर्थिक उन्नती जे करू पाहतात, तेसुद्धा निसर्ग आणि मानवी समाज यांच्या संबंधाची गल्लत करतात, असे मला वाटते. काही मानवी व्यवहारांवर निर्बंध घातले, उदा. अनिर्बंध गुरे - चराई, अनिर्बंध जंगलतोड आणि निसर्गाचा योग्य वापर करण्यास गरीबांना शिकविले की, त्यांची सांपत्तिक स्थिती सुधारेल, असे त्यांचे सूत्र असते. या गोष्टी जे साध्य करून दाखवितात त्यांचा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरव होतो. मात्र एकदा ही प्रक्रिया सुरू झाली की, तिचा शेवट काय होईल, याचा विचार त्यांनी क्वचितच केलेला आढळतो. संपत्ती मिळविण्याची क्रिया एकदा सुरू झाली की तिला योग्य वेळी रोखू शकणाऱ्या नैतिक शक्ती आज आपल्या समाजात नाहीत आणि कायद्यासारख्या ज्या व्यावहारिक शक्ती आहेत, त्यांना निष्प्रभ करण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यामुळे आजचे गरीब उद्या श्रीमंत बनणार, ते आजच्या श्रीमंतांचे अनुकरण करूनच, निसर्गाच्या असमतोलात भर घालूनच!

गरीबांची आर्थिक उन्नती करू पाहणाऱ्या किती सामाजिक आणि राजकीय पुढाऱ्यांनी ही गोष्ट विचारात घेतली आहे? अविकसित राष्ट्रांतील गरीब जनता उद्या श्रीमंत झाली तर निसर्गाचे काय होईल, याची चिंता यामुळेच विकसित राष्ट्रांतील जनतेला भेडसावीत आहे. पण निसर्गाचा नाश होऊ नये म्हणून स्वतःचा उपभोग कमी करण्यास मात्र ते तयार नाहीत. भारतातील जनता **श्रीमंत होण्याचा प्रयत्न करीत आहे. विकसित राष्ट्रांचेच अनुकरण करून. फरक इतकाच की इतर राष्ट्रांतील संपत्ती लुटून ते श्रीमंत झाले, होत आहेत, आपल्याला ते शक्य नसल्याने आपण आपलीच निसर्गसंपत्ती लुटून श्रीमंत होण्याची धडपड करीत आहोत!**

□

निसर्गाला न लुटता आर्थिक उन्नती होऊ शकेल का? जरूर होईल. निसर्ग - शिक्षणातून हे साध्य होत नसेल, तर ते निसर्ग-शिक्षणच नव्हे. हे साध्य करण्याचा मार्ग एकच. माणसाच्या प्राथमिक गरजा - पोटापुरते अन्न, पाणी, जळण, चारा, लाकूड, कपडा या भागविण्याची, सतत भागतील हे पाहण्याची, क्षमता असलेला निसर्ग प्रथम निर्माण करणे, जगविणे, त्यात भर घालणे आणि नंतर बाकीच्या सुधारणांकडे वळणे. **जीवनाच्या प्राथमिक गरजा कमीत कमी खर्चात जिथे भागविल्या जातात, तोच समाज खरा श्रीमंत. निसर्गाचा भरभक्कम पाया ज्या राष्ट्रात तयार होईल, तेच राष्ट्र खऱ्या अर्थाने सुवर्णयुग उपभोगू शकेल.**

ग्रामविकासाच्या सरकारी योजनांमध्ये ही जाणीव क्वचितच दिसते. पण या योजना राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्थाही या जाणिवेतून काम करताना दिसत नाहीत.

**करदात्यांचा पैसा प्रामुख्याने निसर्गाचा पाया भरभक्कम करण्यावर जेव्हा खर्च होईल, तेव्हाच सतत वाढणारी महागाई थांबेल आणि कोणत्याही उद्योगाला अथवा शेतीला अवाच्यासवा अर्थसहाय्य (सबसिडी) देऊन जगविण्याची वेळ सरकारवर येणार नाही. म्हणजेच नफेबाजीला आळा बसेल, श्रीमंत आणि गरीब यामधील दरी कमी होईल आणि सामाजिक स्वास्थ्य नांदू शकेल.**

□

निसर्गाचे नियमन करणारी कोणी एक दैवी शक्ती आहे आणि

तीच सर्वांना न्याय देत असते, किंवा अंतिमत: देणार आहे, हा समज सार्वत्रिक आहे. मग कोणी तिला परमेश्वर म्हणोत, कोणी अल्लाह म्हणोत किंवा कोणी ऑलमायटी गॉड म्हणोत. ही दैवी शक्ती अंतिमत: जेव्हा केव्हा न्याय देणार असेल ती देवो, पण दैनंदिन जीवनात बहुलोकांच्या वाट्याला जो कठोर न्याय येतो, तो कोणत्यातरी मानवी शक्तीकडून मिळालेला असतो किंवा अनेकांच्या चाललेल्या जीवघेण्या स्पर्धेचा किंवा धडपडीचा परिपाक असतो. कित्येकांना निसर्गातील इतर जीवांप्रमाणे 'बळी तो कान पिळी' हाच न्याय माहीत असतो. अन्यायाचा बळी ठरलेले या दैवी शक्तीला अधिकच शरण जाऊन तिची करूणा भाकतात, तर यशस्वी ठरलेलेही आपल्यावरील या दैवीशक्तीचा कृपाप्रसाद कायम रहावा म्हणूनच तिला शरण जातात. दोघंही अगतिकच !

निसर्गाचे खरे स्वरूप जाणून घेण्याचा जे शास्त्रज्ञ प्रयत्न करतात, ते अशा निष्कर्षाप्रत येतात की, नैसर्गिक प्रक्रियेला कोणताही हेतू नाही, ती चांगली नाही किंवा वाईटही नाही. उत्क्रांतीला ठराविक गती नाही, दिशाही नाही. प्रगती किंवा अधोगती ही परिमाणे तिला लावता येत नाहीत. सगळा अकल्पिताचा खेळ. निसर्गाच्या अशा व्यवस्थेत किंवा अव्यवस्थेत या दैवी शक्तीचे स्थान कुठे असेल ? सांगणं कठीण आहे. **दैवी शक्तीची गोष्ट एक वेळ बाजूला ठेवली, तरी माणसाचे स्थान या व्यवस्थेत नेमके कोणते, हे सांगणेही सोपे नाही. कारण न्याय, अन्याय, प्रगती, अधोगती, चांगले वाईट या माणसाच्या बुद्धीला होणाऱ्या जाणिवा आहेत. हे सर्व जाणवण्याची त्याच्या मनाची क्षमता तो वाढवू शकतो किंवा कमीही करू शकतो. शिक्षणाने मने जशी संवेदनाक्षम होतात, तशी ती बोथट करण्याचे सामर्थ्यही शिक्षणात असते. एखाद्या दैवी शक्तीला शरण जाण्याऐवजी माणसाने त्याची बुद्धी आणि कर्तृत्व माणसांमधील स्पर्धेची तीव्रता कमी करण्यात खर्ची घातले, बळी तो कान पिळीमधल्या बळीलाच विवेकी आणि संयमी बनविण्याची क्लृप्ती साध्य केली तर, दैवी शक्तीची पदोपदी जरूरही लागणार नाही. यादृष्टीने मनुष्यच त्याच्या भवितव्याचा शिल्पकार ठरतो.**

□

संपत्ती आणि सत्ता यांच्या अतिहव्यासामुळे मानवी समाजात दरी, कटुता आणि संघर्ष प्राय: निर्माण होतात. नफ्याची कल्पनाच अनैसर्गिक आहे, निसर्ग-नियमात बसणारी नाही, नफा सतत वाढविणं हे फसवं आहे, अशी शिकवण जर लहानपणापासून मिळाली आणि जे हुशार, कर्तृत्ववान् आहेत त्यांची बुद्धी व शक्ती नफेखोरीकडे न जाता दुसरीकडे वळविता आली तर मानवी समाजातील संघर्षाचे फार मोठे कारण दूर होणार आहे. संपत्तीचा लोभ कमी झाला, तर सत्तेचा हव्यासही तितक्याच प्रमाणात कमी होणे शक्य आहे. त्यासाठी आवाहन मानवाच्या विवेकाला हवे, अज्ञात दैवी शक्तीला नको !

□

विश्वशांतीचा घोष करणारेही निसर्गाच्या रूपाकडे दुर्लक्ष करतात असे म्हटले पाहिजे. निसर्गात संघर्ष अटळ आहे, तसाच तो मानवी समाजातही आहे. हिंसेपासून कोणताच जीव वंचित नाही. जगण्याच्या धडपडीतच हिंसेचा जन्म आहे. सर्वांना पुरून उरणारा निसर्ग जेव्हा जन्माला येईल तेव्हाच ही धडपड थांबेल. पण ही गोष्ट फक्त कल्पनेत किंवा स्वर्गातच शक्य आहे. मात्र निसर्गाला आजच्यापेक्षा जास्त समृद्ध करून ही धडपड अनेकांसाठी सुसह्य करणं आणि त्याप्रमाणात हिंसेचं प्रमाण कमी करणं हे मात्र शक्य आहे. माणसाच्या विवेकाला आणि धार्मिक प्रवृत्तीला आवाहन करण्याबरोबरच निसर्गाला समृद्ध करून मानवी जीवनातला आर्थिक संघर्ष कमी करणे, हे आज विश्वशांतीसाठी आवश्यक आहे.

**निसर्ग हा सर्वव्यापी आहे. शिक्षणाचे माध्यम म्हणून त्याचा उपयोग करायचा तर जीवनाच्या सर्व अंगांना त्याचा स्पर्श झाला पाहिजे. निसर्ग-निरीक्षण ही त्याची पहिली पायरी आणि विवेकी मानवाचा जन्म ही शेवटची !**

□

**प्रकाश गोळे**
१/ब अभिमानश्री हौसिंग सोसायटी,
पाषाण रस्ता,
पुणे-४११ ००८

ROPLAS

**ROPLAS (INDIA) LIMITED**

REGISTERED OFFICE & WORKS
145, MUMBAI-PUNE ROAD, PIMPRI, PUNE-411 018
TELEPHONE : 773915, 773916, 777119
TELEX : 0146-288 RPLS IN
TELEGRAMS : 'ROPLAS' PIMPRI PF.
FAX : (0212) 775873

MANUFACTURERS OF A WIDE RANGE OF FIBREGLASS REINFORCED PLASTIC PRODUCTS

□ BODIES FOR JEEP TYPE VEHICLES □ DRIVER'S CABINS FOR TRUCKS □ MULTIPURPOSE PROTABLE CABINS □ FOOD AND BAR CARS FOR AIRLINES □ COMPONENTS FOR AUTOMOTIVE AND ELECTRICAL INDUSTRIES


*BRANCHES*
DELHI, MUMBAI, CALCUTTA, MADRAS

# वसा : माणसाला जागं करण्याचा !

□ ■

*पाणी पंचायत ही संकल्पना मांडून तिचा पाठपुरावा करणाऱ्या विलासराव साळुंखे यांनी पुणे जिल्ह्यातल्या आंबेगाव तालुक्यातल्या ठाकरवाडी या आदिवासी खेडयात असाच प्रयोग सुरू केला आहे. त्याविषयी स्वत: विलासराव साळुंखे, त्यांचे कार्यकर्ते आणि आदिवासी गावकरी यांच्या मुलाखती*

□ ■



समाज आणि निसर्गसंस्कार

माझा जन्म एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. पण सुदैवानं स्वातंत्र्यानंतर राष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीत शिक्षणानं मला संधी मिळाली. तांत्रिक शिक्षणानंतर औद्योगिक प्रक्रियेत भाग घेता आला. त्यात जगाच्या फेऱ्याही झाल्या. पण १९७२ चा दुष्काळात माझी जीवनदृष्टीच बदलून गेली. आपल्याला वैयक्तिक जीवनामध्ये संधी मिळाली खरी. पण आपला जो समाज आहे त्यातल्या बहुसंख्यांना साधं रोज दोन वेळ पोटसुद्धा भरता येत नाही हे त्या दुष्काळात मला जाणवत राह्यलं. त्यांच्यासाठी आपल्याला आपल्या परीनं काय करता येईल असा विचार मनात येत राह्यला आणि अधिक विचार करताना असं दिसलं की, सर्वसाधारणपणे हा जो समाज चालत आला आहे, त्याच्यामध्ये काहीतरी प्रेरणाशक्ती आहे म्हणून तो चालत आला आहे. मग असाही विचार मनात आला की, या त्यांच्या प्रेरणाशक्तीला जर जागृत केलं आणि जर संघटन मिळालं तर ते काहीतरी करू शकतील.

हे आम्हाला पाणी पंचायतीत दिसलं. शेतकऱ्यांना पाण्याची सोय झाली व प्रत्येकाला आपल्या स्वत:चे कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. परावलंबी राहू नये. स्वत:च्या प्रयत्नानंच आपण उभं राहावं ही प्रेरणा त्यांना मिळाली. ही प्रेरणा मिळाल्यानंतर ते उत्साहानं कामाला लागले.

ही १९७२ च्या दुष्काळातील गोष्ट आहे. त्या वर्षी जी मोठी नैसर्गिक आपत्ती महाराष्ट्रावर कोसळली आणि चाळीस लाख लोक स्वत:ची शेती असूनही खडी फोडण्याच्या कामावर काम करीत होते. त्यावेळी मला असं वाटलं की पुण्यापासून फक्त पस्तीस किलोमीटर्स अंतरावरच्या एका तालुक्यामध्ये दहा हजारांवर लोक खडी फोडताहेत आणि पुण्यासारख्या एका औद्योगिक क्षेत्रात आम्ही जागतिक उद्योग आणि विकास क्षेत्राशी जोडले गेलेलो आहोत - आणि तिथे तालुक्यात दोन रूपये रोजावरती लोक काम करायला तयार आहेत!

कोणतीही शेती पाण्याशिवाय होऊ शकत नाही. पाऊस हा सगळीकडे दरवर्षी अगदी सारख्या प्रमाणात पडेल असं नसतं. प्रथम काही ठिकाणी कमी पडतो तर काही ठिकाणी जास्त. त्यामुळं निसर्गावरच, पावसावरच शेती जिथे अवलंबून असते, त्या शेती उत्पादनात फारशी वाढ होऊ शकत नाही. पण त्याच शेतीला सिंचनाची सोय उपलब्ध झाली तर, थोड्या जमिनीमध्ये देखील

अधिक उत्पन्न शेतकऱ्याला मिळू शकतं. त्यावर त्याला आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चांगल्या पद्धतीनं करता येऊ शकतो. त्यामुळे खऱ्या अर्थानं शेतीला संरक्षित पाण्याची उपलब्धता कशी निर्माण करायची हा आपल्यापुढचा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे. याची जाण १९७२ च्या दुष्काळात महाराष्ट्रात हिंडत असताना मला आली.

आज सगळीकडे पाण्याची साठवण मोठमोठ्या धरणातूनच केली जाते. मग मोठ्या कॅनाल्समधून शेतीला पाण्याची सुविधा निर्माण करून द्यायची या योजना राबवल्या जात आहेत. त्या राबवल्या पाहिजेत याबद्दल काही दुमत नाही. पण त्या पाण्याचा जो वापर आणि जे वाटप आहे त्याचा फायदा दुर्दैवाने फारच थोड्या लोकांना उपलब्ध होतो. बहुसंख्य लोकांना त्या पाण्याचा फायदा मिळतच नाही. महाराष्ट्र हे मोठं औद्योगिक राज्य असूनही आजची परिस्थिती अशी आहे की, फक्त सोळा टक्के जमीन सिंचनाखाली आहे आणि अजूनही चौऱ्याऐंशी टक्के जमीन ही पावसावरती अवलंबून आहे. आणि ज्या पद्धतीनं सिंचनाचं नियोजन चाललेलं आहे ते जर अशाच पद्धतीनं चालू राह्यलं, त्यात काही बदल घडला नाही, तर मोठ्या प्रमाणात सरकारी तिजोरीतून भांडवली खर्च होऊन देखील वीस टक्के भागधारकांपेक्षा जास्तजणांना पाणी मिळणार नाही. ऐंशी टक्के भागधारक तर पाण्यापासून वंचितच राहतील आणि त्यांची जमीन म्हणजे सगळ्या उपलब्ध जमिनीपैकी सत्तर टक्के जमीन ओलिताखाली येणार नाही.

म्हणून आम्ही सुरुवातीला १९७४ पासून १९७९ पर्यंत नायगावला मूलभूत प्रयत्न केले. गावात पावसाचं जे काही पाणी पडतं त्याची जर साठवण केली आणि त्याचं वाटप आणि वापर जर योग्य पद्धतीनं केला गेला तर, गावातली किमान वीस पंचवीस टक्के जमीनदेखील संरक्षीत सिंचनाखाली आणता येईल आणि प्रत्येक कुटुंबाला, एकदोन एकराला पाणी देता येणं शक्य होईल. हा प्रयोग आम्ही गेली पंधरावीस वर्षं पुरंदर तालुक्यात आणि महाराष्ट्रातल्या इतर अनेक ठिकाणी केला आणि त्याच्यातून पाणी पंचायत ही एक संकल्पना उभी राह्यली. नैसर्गिक जी साधनं आहेत - जमीन आहे, पाणी आहे - त्यावर सर्व समाजाचा सारखाच हक्क आहे. म्हणून ' पाण्याचं वाटप ज्याच्याकडे जितकी जमीन आहे, त्याला तितकं पाणी ' हे न करता 'कुटुंबाला पाणी' ही त्या मागची कल्पना. जे काही उपलब्ध पाणी आहे - गावपातळीवर उपलब्ध झालेलं, तसंच इतर ठिकाणाहून त्या गावाला उपलब्ध झालेलं - हे सगळं पाणी आहे याचं वितरण हे गावातल्या सगळ्या लोकांना, सर्व कुटुंबियांना, सारख्या प्रमाणात मिळायला पाहिजे आणि हे जर झालं तर, जमिनीचं वितरण आणि पाण्याचं वितरण समतेच्या आधारावर केलं गेलं तर, सर्वांना समान संधी मिळेल. या संकल्पनेनं पाणी पंचायतीचं काम वैज्ञानिक आधारानं सुरू केलं होतं.

हे करीत असताना आम्ही पुणे जिल्ह्यातल्या आंबेगाव तालुक्यातल्या ठाकरवाडी गावातही या प्रयोगातून विकास कामं हाती घेतली. हा प्रयोग मुख्यत: ठाकर आदिवासी समाजातल्या लोकांच्या एकंदर विकासाच्या बाबतीतला प्रयोग आहे. या ठिकाणी सत्तर टक्के लोक आदिवासी आहेत. या गावाच्या बाजूला जंगल जमीन आहे. पण ती अत्यंत निकृष्ट, आणि ओसाड आहे आणि या समुहाला शेतीची जमीन अत्यंत कमी आहे. गावातल्या एकूण जमिनीपैकी

## पंचायतीच्या सामुहिक विकासाची प्रेरणा शपथ

आम्ही ठाकरवाडी (चास) ता. आंबेगाव, जि. पुणे येथील सर्व ग्रामस्थ नागरिक, स्त्री, पुरुष आणि मुले मिळून आज ता. २५ एप्रिल १९९८ रोजी आमच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाच्या प्रकल्प शुभारंभाच्या प्रसंगी निष्ठापूर्वक या सभोवतालच्या निसर्गमातेला ठेवून शपथ घेत आहोत की -

- राज्यशासनाने आणि केंद्रशासनाने अनेक कल्याणकारी योजना येत्या पन्नास वर्षात राबविल्या आणि त्यावरती प्रचंड पैसा खर्च केला. पण आमचे दारिद्र्य हटले नाही. रोजगारीचा प्रश्न वाढत गेला आणि परिसरातील निसर्ग सृष्टीही उजाड झाली. आजच्या ह्या खालावलेल्या परिस्थितीचा विचार करून आम्ही आपल्या गावचा सामूहिक विकास आपणच आखून त्याची कार्यवाही करण्याचा निर्धार करीत आहेत.
- जंगल जमिनीचे संवर्धन, शेतीच्या उत्पन्नात स्वावलंबन आणि जमीन-पाण्याचे समतेच्या आधारावर वाटप आणि योग्य वापर करून आम्ही निरंतर विकास घडवू.
- वाढती लोकसंख्या आणि नैसर्गिक साधन सामुग्रीची मर्यादा याचा परिणाम, एकूण विकास होऊनही त्याच्या लाभाने बहुजनांचे आर्थिक राहणीमान उंचावण्यात मर्यादा येते. लोकसंख्या नियंत्रित करणे हा सामूहिक लोकहिताचा कार्यक्रम झाला पाहिजे. आणि त्या दृष्टीने आरोग्य, शिक्षण ह्यावरती आम्ही भर देऊ.
- गावातील सर्वांना आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करण्याचे ध्येय डोळ्यापुढे ठेवून समृद्धीकडे वाटचाल करू. परंपरेने धर्म, जात-पात ह्यावर टिकून राहिलेली समाज व्यवस्था मोडून ती एकसंध मानवी मुल्यांवर उभी करण्याचा प्रयत्न करू.

फक्त वीस टक्के जमीन यांच्याकडे आहे. त्यातल्या जवळ जवळ निम्म्या कुटुंबियांकडे जमीनच नाही. आणि ज्यांना आहे त्यांच्याकडे एक दोन एकरापेक्षा जास्त नाही आणि तीही अशी माळरान, निकृष्ट. संपूर्ण जमीन जिरायती आहे.

या सगळ्याचा परिणाम असा की त्यांना तिथल्या जमिनीवरती पोट भरता येत नाही. त्यामुळे पिढ्यान्‌पिढ्या ही माणसं रोजगारीकरता सारखी भटकंती करीत असतात.

यांच्या रोजगारीचा प्रश्न सोडवायचा आणि यांच्या सर्वच दृष्टीने विकास करायचा असेल तर एकांगी प्रयोग न करता, एकात्मक प्रयोग करणे आवश्यक असते. असे प्रयोग मुख्यत: तिथली जंगल-जमीन, शेतीची जमीन, पाणी, दुभती जनावरं आणि निवारा अशा सगळ्यांचं एकत्रीकरण करता आलं तर, इथं आत्ता बिघडलेला निसर्गाचा समतोल पुन्हा साधता येईल आणि लोकांनाही खऱ्या अर्थानं विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होता येईल.

राज्यपातळीवर काय किंवा राष्ट्र पातळीवर काय आज जवळजवळ आठ टक्के लोकसंख्या ही आदिवासी आहे. त्यांच्याकरता, एकूण नियोजनाच्या आठ टक्के खर्च शासन करीत असते. पण दुर्दैव असे की गेल्या तीस वर्षात हजारो कोटी रुपये त्यांच्या नावे खर्च झाले. पण त्यांचं दारिद्र्य काही हटलेलं नाही.

या ठिकाणी असा प्रयोग झाला की, येत्या तीन वर्षांमध्ये या गावातला कोणीही दारिद्र्यरेषेखाली राहणार नाही. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे हे आदिवासी चांगल्या रीतीनं शेती करतील. जंगल चांगल्या रीतीनं वाढवतील. परिसर हिरवागार करतील आणि हे सगळं करीत असताना संपूर्ण समाज आपल्या प्रेरणेनं, आपल्या नेतृत्वानंच हे सगळं करण्यासाठी सहभागी होईल, अशा तऱ्हेचा हा आमच्या नियोजनाचा आराखडा गेल्या पाचसहा महिन्यात आम्ही आखलेला आहे आणि तो आखताना एकंदरीतच या भागाच्या विकासाची दिशा, कल्पना व आखणी कशी असावी हे ठरवलं, सामुहिक विकासाची प्रेरणा शपथ देखील तयार केली आणि ती या गावकऱ्यांनी घेतलेली आहे.

'आपला विकास आपणच करायचा' या जिद्दीनं ही गावकरी मंडळी आता कामाला लागली आहेत.

सगळ्याच गोष्टी शासनावर टाकून आपण स्वस्थ बसून राह्यचं ही वृत्ती या गावकऱ्यांनी आता टाकून दिली आहे. वरून लादली जाणारी विकासाची कल्पना त्यांनी झिडकारून टाकून स्वत:च्याच पायावर उभं राहून आपला विकास आपणच घडवायला हवा हा संस्कार त्यांच्या मनावर आम्ही बिंबवू शकलो. अनेक वर्षांच्या अथक परिश्रमानंतर, चिकाटी न सोडता, विरोध न जुमानता प्रत्येकाच्या मनात आपल्या गावाच्या विकासाचा संस्कार रुजविण्यात आम्ही यशस्वी होऊ शकलो. त्यासाठी आमचे कार्यकर्ते श्री. खेडकर आणि गावातली तरुण वृद्ध मंडळी, तसंच महिला आणि माझी पत्नी कल्पना सगळ्यांनीच खूप धडपड केली. त्यांनी तांत्रिक गोष्टी सुलभपणे गावकऱ्यांना समजावून सांगितल्या आणि आपण गावकऱ्यांनीच हे काम करायचे आहे ही गोष्ट मनावर बिंबवली. तशी आखणीही केली.

ही आदिवासी माणसं फार कष्ट करणारी माणसं आहेत. परंतु त्यांच्या कष्टाला फळ येत नाही. कारण त्यांना ज्या काही किमान सुविधा मिळायला हव्यात, त्या मिळत नाहीत. ती संधी आम्ही त्यांना उपलब्ध करून दिली तर ते करू शकतात. आपल्या ज्ञानाचा उपयोग - व्यवस्थापनात कौशल्याचा उपयोग केला तर त्यांच्यात रूपांतर घडू शकते. आणि मग ती प्रेरणा व्यक्ती-व्यक्तीत वाढत जाते.

□

**मी बबन कुशाबा जाधव**

मपली गरीब स्थिती पहिल्यापासून. मोळ्या वाह्यला आम्ही जायचो. वाडवडील लंगोटीवर असायचा आम्ही आपले लहान लहान. मोळीतून रुपया दोन रुपये मिळायचे. त्यावर आम्ही जेवण भागवायचो. असं करता करता भयंकर परिस्थिती बिकट आली. सात मुलं होती. काही काळानंतर आम्हाला साळुंखे साहेब, खेडकर अशांनी सांगायला सुरुवात केली, की झाडापासून आपल्याला उत्पन्न मिळतं, तर झाडं लावा. आम्हाला ते पटलं की! मग आम्ही खड्डे खणले आणि त्या 'टेक्निक' प्रमाणे आम्ही झाडे लावायला लागलो. त्यांच्यावर आम्ही लक्ष ठेवीत राह्यलो. गुरं आमचीच आणि झाडंही आमचीच! गुरांवर देखरेख करण्यासाठी, त्यांनी वाढणारी झाडं खाऊ नये म्हणून आमच्या पंचायतीची चार पाच लोकं ठेवली. आता आम्ही पुण्याचं ग्रीन हाऊस पाह्यलं. त्याचप्रमाणंच ग्रीन हाऊस आम्ही आमच्या या जमिनीवर करणार आहोत!

□

**भामाबाई सखाराम केदारी, ठाकरवाडी या आदिवासी महिलेनं सांगितलं -**

आम्ही मोळीला जातो. बटाटं, कांदं, लसून यांच्या शेतीवर कामाला जातो. आमची लयच परिस्थिती बिकट आहे. मोठमोठालं शेतकरी, त्यांनी टाकून दिलेलं बटाटं - कांदं, सडकं, कुजकं - ते आम्ही घेऊन यायचो आणि ते सडकं बटाटं - कांदं कापून उकडून खायचो इतकी परिस्थिती आमची होती. आत्ता आम्ही कामाला जात नाही. आता झाडी लावतो. बांबू, फणस, चंदन, साग, हिरडा, बेहडा - यापासून आम्हाला फायदा होईल. झाडी वाढवली तर आमच्या आयुष्याचं कल्याणच आहे की! आम्ही गावकरी सगळे एकत्र आल्यामुळे हे घडतंय. पूर्वी पाच वर्षं आम्ही झाडं वाढवायचा प्रयत्न केला. पण कुणी काडी लावायची. मग झाडं जळून जायची. त्यामुळं झाडं काही वाढली नाहीत. आता आम्ही अकराजणं आहोत देखरेखीला. त्यामुळं झाडं वाढतात. आता फॉरेस्टवर हिर खणलेली हाये. आता आम्हाला नवीन गावठाण